| | |
|---|---|
| MHKO110006162026 | फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ६१/२०२६<br>मधील नि.क्र. १ वरील आदेश<br>मुसा उर्फ मुसाइस्लाम अब्दुलरजाक जमादार<br>वि.<br>महाराष्ट्र शासन |

अर्जदार मुसा उर्फ मुसाइस्लाम अब्दुलरजाक जमादार यांनी त्यांचे मालकीचा राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र. १, कोल्हापूर यांनी गु. र. नं. ३७७/२०२५ मध्ये जप्त केलेला सॅमसंग कंपनीचा S25 ULTRA 5G (12-256) मोबाईल परत मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार यांचे कथनानुसार, त्यांच्या मालकीचा सॅमसंग कंपनीचा S25 ULTRA 5G (12-256) राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र. १, कोल्हापूर यांनी दाखल केलेल्या गुन्हयाचे कामी जप्त केलेली आहे. सदरचा मोबाईल हा अर्जदार यांच्या मालकीचा असून त्यांच्या रोजच्या वापरातील आहे. अर्जदार यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही. सदरचा जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशनला बंद अवस्थेत पडून राहिलेस त्यामध्ये तांत्रिक बिघाड होवून अर्जदार यांचे मोठे नुकसान होणार आहे. सदर अर्जदार हे सदरचा जप्त मुद्देमाल न्यायालयाचे आदेशाप्रमाणे योग्य त्या अटी व शर्थीचे बॉन्ड वरती परत घेणेस तयार आहेत. सदरचा जप्त मुद्देमाल अर्जदार यांचे ताब्यात दिलेस ते त्यामध्ये काहीही व कोणताही बदल करणार नाहीत किंवा सदर मुद्देमाल कोणासही विक्री अगर तबदिल करणार नाहीत. अर्जदार यांचेवर नमूद दारू विक्रीचा गुन्हा व सदर जप्त मुद्देमाल मोबाइल याचा कायदेशीरपणे कोणताही संबंध येत नाही अगर सदर मोबाइल फोन हा पुढील तपासासाठी आवश्यक नाही. प्रस्तुत अर्जदार हे सदरचा मुदेमाल मे.न्यायालयाने पारित केलेल्या आदेशा प्रमाणे ज्या त्या वेळेस मे.न्यायालयात हजर करणेस तयार आहेत. सदर जप्त मोबाईल त्यांच्या ताबेत दिलेस त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल अथवा फेरफार करणार नाही किंवा त्याची विक्री अगर तबदील करणार नाही असे कथन अर्जदार यांनी केले आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याबाबत विनंती अर्जदार करतात.

०३. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.१, कोल्हापूर यांनी त्यांचे म्हणणे नि.६ वर दिलेले आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, सदरचा मोबाईल हा महाराष्ट्र

दारूबंदी अधिनियम चे कलम ६५(अ)(इ)(फ), ८०, ८१, ८३, ९० व १०८ प्रमाणे गुन्हयात जप्त केलेला आहे. सदरचा मोबाईल हा कार्यालयामध्ये सुरक्षित आहे. अर्जदार हा सदर मोबाईलचा वापर करून पुन्हा अशाच प्रकारची अवैद्य दारु वाहतूक करणेसाठी तसेच संपर्ककामी वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदरचा मुद्देमाल अर्जदार यांना परत करण्यात येऊ नये अशी ते विनंती करतात.

०४. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणणे नि. ७ वर दिलेले आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे. सदरचा मोबाईल हा अर्जदार यांच्या मालकीचा असल्याबाबत प्रथमदृष्टया दिसून येत नाही. अर्जासोबत जे आधारकार्ड व निवडणुक ओळखपत्र जोडले आहे त्यावरून दोन वेगळे इसम असल्याचे दिसून येते. परंतु, अर्जामध्ये हे दोन्ही व्यक्ती एकच असल्याचे दिसून येते. मोबाईल मालकीची झेरॉक्सप्रत सोबत जोडली आहे. पुराव्याच्या कायदयानुसार सदर कागदपत्र पुराव्यात वाचता येणार नाही. सदरचा जप्त मुद्देमाल अर्जदार यांच्या ताब्यात दिलेस ते त्याचा वापर अशाच प्रकारच्या गंभीर स्वरुपाचा गुन्हा करणेसाठी वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच अर्जदार हे सदरचे वाहन सुनावणीकामी मे. न्यायालयात हजर करतील याची शाश्वती नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती सरकारी वकील करतात.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले असता, अर्जदार यांनी सदर अर्जाचे कामी नि. ३ सोबत मबाईल ची पावती, अर्जदार यांचे आधारकार्ड, मतदान ओळखपत्र व किरकोळ अर्ज २४५/२०२५ चा मा. न्यायालयाने पारित केलेला आदेश तसेच नि. ५ सोबत अर्जदार यांचे आधारकार्ड, अर्जदार यांनी निवडणूक आयोगाकडे केलेला अर्ज हजर केलेले आहेत. अर्जदाराने दाखल कागदपत्रांवरून जप्त मोबाईल हा अर्जदार यांच्या मालकीचे आहे हे प्रथमदर्शनी दिसून येते.

०६. ***सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य (ए आय आर २००३ एससी ६३८)*** यामध्ये मा. उच्च न्यायालय यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ नुसारचे अर्ज हे लवकरात लवकर निकाल करण्यासाठी व जप्त माल हा जास्त कालावधीसाठी ठेवण्यात येवू नये असे निर्देश नमूद केलेले आहे. फौजदारी प्रक्रिया

संहिता कलम ४५१ मधील तरतुदी या बी.एन.एस.एस.,२०२३ कलम ४९७ शी सुसंगत आहेत.

०७. अर्जदार यांनी व्यक्त केलेल्या साशंकता की, सदर मोबाईल जप्त राहिल्यास निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १, कोल्हापूर यांचे कार्यालय येथे तसाच राहील्यास तो वापरण्यायोग्य राहणार नाही व त्यामुळे अर्जदार यांचे नुकसान होणार आहे. सदर जप्त मुद्देमाल अर्जदार यांना त्यांचे रोजच्या वापरासाठी जरूरीची असल्याने सदर मोबाईलचा ताबा मिळणे आवश्यक व गरजेचे आहे या बाबी संयुक्तीक वाटतात. तसेच आजपर्यंत इतर कोणीही हजर राहून जप्त मोबाईलची मागणी केलेली नाही. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.१, कोल्हापूर यांनी प्रस्तुत अर्जास दिलेले म्हणणे विचारात घेतले. तथापि, सदरचा मोबाईल तसाच पडून राहिला तर काही कालावधीनंतर तो निष्कामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे योग्य त्या अटी व शर्ती घालून जप्त मोटर कार परत देणे न्यायोचित होईल. वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालील आदेश पारीत करते-

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १, कोल्हापूर यांना आदेशित करण्यात येते की, गु. र. नं. ३७७/२०२५ मध्ये जप्त केलेला सॅमसंग कंपनीचा S25 ULTRA 5G (12-256) मोबाईल चा अंतरीम ताबा अर्जदार मुसा उर्फ मुसाइस्लाम अब्दुलरजाक जमादार रक्कम रू. १,००,०००/- (रक्कम रूपये एक लाख फक्त) चे हमीपत्र रक्कम रू. ५००/- चे नॉन ज्युडीशियल बॉडवर देण्यात यावे. |
| ३. | अर्जदाराने सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सदर मोबाईल त्रयस्थ इसमास हक्क किंवा अधिकार निर्माण करू नये व अन्य कुठल्याही प्रकारे विल्हेवाट लावू नये किंवा त्यांच्या स्वरूपात बदल करू नये. |
| ४. | अर्जदाराने प्रकरणाच्या चौकशीसाठी जेव्हा जेव्हा सदर मोबाईलची आवश्यकता असेल तेव्हा तेव्हा तो हजर करावा. वरील जप्त मोबाईल परत करताना तपासी अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक |

| | |
|---|---|
| | क्र.१, कोल्हापूर यांनी त्याचा सविस्तर पंचनामा करावा. |
| ५. | अर्जदार याने वरील मोबाईलचे छायाचित्र काढून वरील मोबाईल त्याच्या ताब्यात मिळाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत सदर प्रकरणी दाखल करावेत. |
| ६. | अर्जदाराने भविष्यात जप्त मोबाईल इतर कोणीही हक्क शाबित केल्यास तो त्यासाठी त्यांच्याप्रती सर्वस्वी जबाबदार राहील असे शपथपत्र सदर कामी दाखल करावे. |
| ७. | निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १, कोल्हापूर यांना पत्राद्वारे सुचित करण्यात यावे. |
| ८. | सदरचा आदेश, हमीपत्र, फोटो व पूर्ततेची कागदपत्रे गु.र. नं. ३७७/२०२५ चे मूळ दोषारोपपत्रसोबत दाखल करण्यात यावे. |

**sd/-**

दिनांक – ०९/०७/२०२६
पेठवडगाव.

(आर. एस. मोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
पेठवडगाव.